# प्रभुतरुण

| वर्ष ५१ | अंक ०६ | मुंबई | जानेवारी, २०१८ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**

*कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**

*संपादकीय*

## ‘कम जॅन...’

**—सुहासिनी कीर्तिकर**

मित्रांनो, १९१८ साल उजाडले बरं का. पूर्वी दसरा आला की पुस्तकातला आपल्या मोरूचा बाप म्हणायचा, ‘मोरू ऊठ. दसरा उजाडला’ दिवाळी आली की पुस्तकातल्या पोरी म्हणायच्या, ‘दिन दिन दिवाळी, गाई म्हशी ओवाळी.’ पण काळाच्या ओघात हे ‘उजाडणे’ उजाड झाले. गाई म्हशी तर गोवध, हत्याबंदी, मृत गाईचे मांस नेणाऱ्याला म्हणजे वाहकाला ‘स्वर्गात’ पोहोचवणे, त्यावरून जातीपातीचे राजकारण करायला धूळवड खेळू लागल्या... असे सगळे नवीन ‘सण’ (??!!) सुरू झाले. एखादा उगाच वैतागवाडी गाठत बडबड करू लागला की आपण म्हणतो, ‘याचं झालं सुरू!’ तसेच हे ‘सण’ राष्ट्रीय पातळीवर अधूनमधून आपले सुरूच होतात! होवोत, होवोत बापडे. पण मग आपण करायचं काय? छे! छे! अजिबात बुचकळ्यात पडायचं नाही आपण. ‘चला हवा येऊ द्या’, ‘तुमच्यासाठी काय पन’, ‘न.स.ते. उद्योग’, ‘विनोदाची जी.एस.टी.’ आहेतच की आपल्या दिमतीला. मग काय होतं? छे! छे! प्रश्न विचारायचाच नाही. उत्तर अगदी अगदी सोप्पं आहे. अहो, डोकं ठिकाणावर ठेवण्याच्या आपल्या सचोटीला प्रचंड भूल दिली जाते. हं! हं! ही माझी लोणकढी भूलथाप नाही हं. भले भले मानसशास्त्रज्ञ आपल्याला अगदी मनात शिरून हेच सांगतात.. हा! हा! हाऽऽऽ.... मोठ्यानं हसलं की तनामनातले सगळे ताण सैल होतात. ‘मनातले सगळे हेतू शेण झाले’... असे आपले बा. सी. मर्ढेकर वेगळ्या संदर्भात म्हणतात. आपण संदर्भ नेहमीच बदलतो. तसा इथेही संदर्भ बदलून मनातले सगळे ताण, सगळ्या काळज्या, सगळे संघर्ष आणि हो; मुख्य म्हणजे जगण्याच्या सगळ्या लढाया अशा विनोदाने तत्क्षणी शेण होऊन जातात; म्हणजे नगण्य होत जातात. मग सगळ्या चिंता, काळज्या, सगळे ताणबीण बाजूला होऊन आपण नव्यानं लढायला, नव्यानं जगायला, नव्यानं ‘आनंदाचा गुणाकार’ करायला (‘आनंदाचा गुणाकार’ - कोणी बरं म्हटलंय? अरे हो, प्रभुतरुणाच्या नोव्हेंबरमधल्या संपादकीयात मीच म्हटलंय नाही का!) तरतरीत होऊन सज्ज होतो.

तर मित्रांनो; आपण असे सज्ज होऊ या. जानेवारीपासून सुरू होणाऱ्या २०१८ नववर्षाचे हर्षभरल्या टवटवीने स्वागत करूया. काळ कुणासाठी थांबलाय? वर्ष येणार, जाणार. गळलेल्या पाचोळ्यामुळे झालेल्या जागेत झाडावर नवी हिरवाई खुलवत पालवी येणार. झाड फुलांनी, फळांनी बहरणार. हा तर निसर्गनियमच आहे. मग या निसर्ग नियमाविरूद्ध कशाला जायचे? आपणही आनंदाची हिरवाई लेऊन सुखसमृद्धीने बहरून जायचे. हो ना?

तर अशी टवटवी यावी म्हणून मित्रांनो मी अगदीच पुचकट, पाचकट वाटणारे किंवा पोरकट वाटणारे काही ‘इनोद’ इथे देतेय. खरंय ना? ‘तुमच्यासाठी काय पन....!’

शाळेत शिक्षक वर्गातील पक्या नावाच्या विद्यार्थाला उभे करून प्रश्न विचारतात. आता जसा पक्या, तसेच शिक्षक! त्यांचा प्रश्नच पहा... ते विचारतात, ‘‘रामा इज इक्वल टू पक्या; कसे ‘प्रूव्ह’ करशील?’’ पक्या म्हणतो, ‘‘ह्या! अगदी सोप्पे आहे गुरुजी. रामाच्या उलटे करा. काय झाले?’’ आज्ञाधारकपणे गुरुजी म्हणतात, ‘‘मारा.’’

पक्या पुढे विचारतो, ‘‘हिंदीत?’’

आज्ञाधारकपणे गुरुजी म्हणतात, ‘‘पीटो!’’

लगेच पक्या फर्मावतो, ‘‘उलटे?’’

गुरुजी, ‘‘टोपी’’

‘‘पक्या म्हणतो, ‘बरं. इंग्लीशमध्ये?’’

गुरुजी, ‘‘हात्तीच्या. कॅप.’’

तत्परतेने पक्या, ‘‘आता याच्या उलटे?

गुरुजी, ‘‘पर्क.’’

गुरुजींच्या पद्धतीनेच हे समीकरण सोडवत पक्या ‘क्यूइडी’ करीत म्हणतो, ‘‘हां म्हणजे पक्या? हो नं? आलं की उत्तर. रामा इज इक्वल टू पक्या. गुरुजी द्या टाळी.’’ गुरुजी टाळी देतात की नाही; माहीत नाही. पण या अजब प्रश्नाला आणि ‘सिद्धम् साध्यम’ झालेल्या गजब समीकरणाला आपण मात्र मनोमन टाळी देतो. वाचकहो, हे सगळं विदुषकी रूप तुमच्यासाठी हं. तेव्हा हसा, हसा!

हे हसणं थोडं अंतर्मुख होऊन विचार करायला भाग पडेल असा जरा वेगळा विनोद आता वाचा. (मन्नोमन ऐका!) एक जाणता विचारवंत म्हणतो, ‘गाईंना मारायचे नाही’ असा कायदा येऊ घातलाय देशभर. बैलांना मात्र बैलगाडी शर्यतीत उधळायचे? त्यांचे ‘जल्लीकट्टू’ करायचे? शी! काय हे? मुलगी असली तर (गर्भातच) मारायची. मुलगा उधळला तर आहे आता वानप्रस्थाश्रम?’’

बरोबरचे गृहस्थ चकीत होत म्हणतात, ‘‘अहो असं काय? आहे की वृद्धाश्रम!’’ आजच्या वास्तवावर भाष्य करणारा हा विनोद बोचराच आहे. पण काळ पुढे चाललाय. त्याचे बोट धरून हे वास्तवही आपण हसत हसत स्वीकारायलाच हवं. आनंदाने, उत्साहाने, जाणतेपणाने.

कारण आपल्याला पुरतं माहीत आहे की काळ कोणासाठीच थांबत नाही. तो आपण साजरा करायचा असतो. कधी असा विनोदावर हसून, कधी विनोदाने अंतर्मुख होऊन. (हां! हां! ‘अंतमूर्ख’ होऊन नाही हं!) तर काळ चालला पुढे पुढेच.... आपणही विनोदाने (म्हणजे वेगवेगळे विनोद वाचून, हसून) पुढे जाऊ या. तर आता पुढचा विनोद...

भारतात प्रसिद्ध दोनच बिस्किटं(...?) मारी गोल्ड आणि पारले जी. का? तर एक कपात जात नाही, दुसरं कपात गेलं तर परत येत नाही...

....

पुन्हा एकदा शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा ‘इनोद’. शिक्षक म्हणतात. ‘चालढकल’ शब्दाचा अर्थ सांग बरं पक्या.’ पक्या तत्परतेने म्हणतो, ‘सर, उद्या सांगितला तर चालेल?’ म्हणजे पहा, त्याच्या उत्तरातच ‘चालढकल’ चा अर्थ उलगडतो. असंच हुश्शार डोकं कसं गणित सोडवतं पहा... ‘लग्नात वधू आणि वराला सात फेरेच का मारायला लावतात?’- या प्रश्नाला एक इंजिनियरींगचा विद्यार्थी किती ‘शार्प’ उत्तर देतो बघा. ‘प्रत्येक फेरा होमाभोवती ३६० अंशाचा. ३६० या संख्येला एक ते नऊ या संख्येतील फक्त सातनेच भाग जात नाही. म्हणून मग सात फेरे घेतले की नवराबायकोचे संबंध ‘अविभाज्य’ होतात!’ नवराबायकोने विवाह वेदीवर असे अविभाज्य होणे आवश्यकच. पण काय ते गणित आणि काय ते उत्तर!

आता मित्रहो, शेवटचाच एक विनोद सांगून थांबते बरं का! हा विनोद आहे ‘पुणेरी’! पुण्यातल्या गृहिणीने दिलेली ही खास ‘रेसिपी’. किंवा खास ‘टिप’. बेसन लाडवाला लाडू वळल्यावर एक काजू फक्त टोचावा. लग्गेच काढून घ्यावा. म्हणजे टोचल्याजागी छोटासा खळगा पडतो. खाणाऱ्याला वाटते की आपल्याच लाडवातला काजू गळून पडला आहे. अशाप्रकारे एकच काजू सगळ्या किलोभर लाडवाला पुरवावा. काटकसर हा गृहिणीचा धर्म आहे...

तर मित्रांनो; एकेकच विनोद पुरवून पुरवून आनंद लुटत हे नववर्ष ‘प्रभुतरुणा’सोबत खूप खूप आनंदाने जाऊ द्या. नववर्षाच्या तुम्हा सगळ्यांना मनापासून शुभेच्छा. (हा विनोद नाही हं!) खरंच; हे वर्ष तुमच्या इच्छापूर्तीचे, सुखासमाधानाचे जाऊ द्या.

✳

# दूरदेशातून-
# चीनचा नवा सिल्क रोड

-सुजन राणे
panditsujanrane@yahoo.com

गेल्या वर्षी मी चीनचा दौरा केला. त्या वेळी मी चीनची राजधानी बीजिंग व शांघाय ही शहरं पाहिली. या शहरातली चीनची प्रगती पाहिल्यावर डोळे दिपून गेले. तेव्हा मनात स्वाभाविक विचार आला की आपण प्रगतीला की व्यक्तिस्वातंत्र्याला प्राधान्य दिलं पाहिजे? चीनची प्रगती ही खरी प्रगती आहे का? का ती नुसतीच भौतिक आहे? का ती मानवी जीवनातल्या मूल्यांना झुगारून झाली आहे? असे विचार भेडसावण्यासारखे आहेत. कारण चांगलं अन्न, चांगला निवारा, चांगले कपडे हेच माणसाचं ध्येय असू शकते का? त्याच्या पलीकडे त्याला बघण्याची गरज नाही का? निसर्गाने माणसाला ह्या सर्व गोष्टीपलीकडे बघण्याची बुद्धी दिली आहे. हे जरी खरं असलं तरी दररोजच्या व्यवहारात आपण जे पाहतो त्यावरून आपण आपले निर्णय घेत असतो. 'चक्षुर्मय सत्यम' अशी सर्वश्रुत उक्ती आहे.

चीनचा नवा 'सिल्क रोड' हा कुतूहलाचा व विचार करण्यासारखा सध्याच्या परिस्थितीतला विषय आहे. तेव्हा चला सिल्क रोडकडे. जुन्या सिल्क रोडची सुरुवात चीनच्या हान राजवटीमध्ये झाली ( म्हणजे २०७ ख्रिस्तअगोदर ते २२० ख्रिस्तनंतरपर्यंत) ही रस्त्याची व्यवस्था पूर्वीच्या काळी रस्त्याचे एक जाळं होतं, ते कोरिया व जपानपासून थेट भूमध्य समुद्रापर्यंत (Mediterian Sea) पसरलं होतं. सिल्क रोड ही संज्ञा त्या वेळच्या रस्त्याच्या रचनेला प्राप्त झाली ह्याचं मुख्य कारण त्या रस्त्यावरून रेशीम व घोड्यांचा व्यापार पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत मोठ्या प्रमाणात होत असे. हान राजवटीने त्यांच्या झांग कियान दूतातर्फे त्यांच्या व्यापाराचं बस्तान बसवून ते बळकट केलं. व्यापाराने चीनच्या सुधारणेला पुष्कळ महत्त्व प्राप्त झालं. पूर्वीच्या काळी अनेक देशामधून हा रस्ता जात असून, अनेक नावांनी ओळखला जात होता. मार्कोपोलो आणि एडवर्ड गिब्बनसारख्या प्रसिद्ध व्यक्तींनीसुद्धा या रस्त्याचा सिल्क रोड असा उल्लेख कोठे केला नाही. परंतु स्वीडिश भूगोलतज्ञ स्वेन हेडिन यांनी १९३८ साली त्याच्या पुस्तकात सिल्क रोड असा प्रथम उल्लेख केला. वारंवार होणाऱ्या जागतिक राजकीय आणि आर्थिक घडामोडीमुळे ह्या जुन्या रस्त्याची विशेष प्रगती झाली नाही, एवढंच तात्पर्य सांगता येईल.

गेली काही वर्षे म्हणजे एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून चीन या जुन्या सिल्क रोडच्या पुनर्जीवनाच्यामागे जोमाने लागला आहे. नोव्हेंबर १३, २०१७च्या टाइम मासिकात या विषयावर अतिशय माहितीपूर्ण लेख छापून आला आहे. लेखाच्या सुरुवातीचं वाक्य उद्‌बोधक आहे- "Founded four years ago, the city of Khorgos is poised to become the world's busiest inland port, a vital link in China's epochal plan to re-create the Silk Road" फ्रान्सच्या नेपोलियनने असं काहीतरी भाकीत केलं होतं की, "When China gets up from its slumber, the world will open its eyes." चीनच्या या प्रयासामुळे जर जगाच्या दळणवळणाला लाभ होत असेल तर त्यात गैर काहीच नाही. खोरगोस शहरात एक मोकळा प्रांत आहे तिथे रोज ३०,००० व्यापाऱ्यांना आपल्या उद्योगासाठी कारखाने काढण्याची परवानगी व दोन वर्षे भाड्याविना उत्पादन करण्याची मुभा आहे. या आर्थिक सुधारणेच्या प्रांताचा अधिकारी ग्युओ जीआंबीन म्हणतो, ''खोरगोसची जमीन आज मातीने माखली आहे, परंतु तीच जमीन लवकरच सोन्याने मढली जाईल.'' चीनी अध्यक्ष क्षी जीनपिंगच्या म्हणण्याप्रमाणे खोरगोस शहर हे या नव्या 'सिल्क रोड'चे उगमस्थान आहे. तिथून उड्डाणपूल, आगगाडीचे रस्ते, बंदरे यांनी आशिया खंड, आखाती देशातून युरोप व आफ्रिका खंडांना जोडला जाईल. चायना डेव्हलपमेंट बँकने ९०० प्रकल्प ९०० दशलक्ष डॉलर खर्चाने आखले आहेत. १३व्या शतकातल्या घेनगीस खानपासून आजपर्यंत चीनने अशी स्वप्नं पाहिली नव्हती. अध्यक्ष क्षी म्हणतात, "Exchange will replace estrangement, mutual learning will replace clashes and co-existence will replace a sense of superiority." चिनी पुढाऱ्यांच्या स्वप्नांच्या बुडाशी संपूर्ण जागतिकीकरणाची कल्पना आहे, ज्यानुसार ६५ देश, जगाची ७० टक्के लोकसंख्या, तीन-चतुर्थांश ऊर्जा, एक-चतुर्थांश मालमत्ता व सेवा आणि जगाच्या २८टक्के जीडीपी म्हणजे $ २१ ट्रीलीयनपर्यंत व्याप्ती होईल. या संदर्भात ऑस्ट्रेलियाच्या ला ट्रोब विद्यापीठाचे प्रा. निक बिस्ले म्हणतात, "You will have a China that really sits at the beating heart strategically and economically of this most important part of the world." गेल्या तीन शतकात चीनची जबरदस्त प्रगती मुख्यतः त्याच्या सरकारच्या आर्थिक पाठबळामुळे झाली आहे. "China has the resources: its GDP was $11.2 trillion last year, with growth at a slowing though healthy 6.7 % and trade surplus of $48.5 billion in August. "

खोरगोस हे शहर टक्लामाकन वाळवंटाच्या सीमेवर आहे. ह्या शहरातून ७००० मैल रेल्वेचा प्रवास करून २७ चीनी कारखान्यातून युरोपच्या ११ शहराकडे पोहचते. ही जगातली सर्वात लांब माल-वाहतूक करणारी रेलगाडी आहे. गेल्या वर्षी २०५० मालगाड्या ह्या मार्गावरून गेल्या, तर २०१७ अखेर पर्यंत ५००० गाड्या जाण्याची योजना आहे. नव्या 'सिल्क रोड'चं स्वप्न साकारण्यासाठी चीनला राजकीयदृष्ट्या काही अडचणींना तोंड द्यावं लागते . त्या म्हणजे ज्या देशातून ही रेलगाडी जाते त्या देशातली वेळोवेळी बदलणारी राजकीय परिस्थिती. पण चीन त्या देशात कोट्यावधी डॉलर्स आजपर्यंत गुंतवत आला आहे, त्यामुळे ती अडचण त्याच्या स्वप्नाच्या तेवढी आड येत नाही. आर्थिकदृष्ट्या विचार केला तर समुद्राच्या मार्गाने हा माल नेण्यासाठी जेवढी किंमत द्यावी लागते त्याच्या तिप्पट रेलगाडीने नेण्यासाठी द्यावी लागते. पण रेलगाडीने १८ दिवस लागतात तर समुद्राच्या मार्गाने ३५ दिवस लागतात. फळ व भाज्यांसारखा लवकर खराब होणारा माल विमानाने जातो, तर इतर माल स्वस्त मार्गाने जातो. शेवटी कोट्यावधी डॉलर्स उभे करण्यासाठी चीनला सरकारी व इतर बँकाकडे जावं लागते. या गुंतवणुकीतून पैशाच्या दृष्टीने चीनला किती फायदा होतो हे महत्त्वाचं नाही. "Infrastructure is a positive, regardless of whether its financiers handsomely recoup their investment. Roads, bridges and tunnels link communities and boost commerce. The Asian Development Bank says Asia needs $26 trillion of infrastructure through 2030." अमेरिकेचं पाठबळ नसताना ब्रिटन व ऑस्ट्रेलियासारख्या इतर देशाच्या सहाय्याने एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक २०१६ साली अस्तित्वात आली. चीन म्हणतो की, तो जगाच्या आर्थिक नियमानुसार ही बँक चालवू शकेल. बँकेचा अध्यक्ष जीन लिकुन म्हणतो, "Misunderstanding is understandable. It takes time for people to appreciate the concept."

चीनच्या 'सिल्क रोड'च्या पुनर्जीवनामुळे तिचे पुढचे धोरण व उद्दिष्ट स्पष्ट होत चालले आहे. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या ५० वर्षांपासून आजतागायत चीन आणि अमेरिकेमधल्या व्यापारामुळे चीनचा बराच फायदा झाला. इतकी वर्ष अमेरिका स्वतःच्या गरजेसाठी लागणाऱ्या प्रत्येक वस्तू चीनमध्ये तयार करून घेत आली आहे आणि त्यासाठी कोट्यावधी डॉलर चीनमध्ये जणू काय ओतत आली आहे. या सर्व डॉलर्सचा उपयोग आपल्या प्रगतीसाठी फार विचारपूर्वक व जाहिरातबाजीच्या अधीन न होता चीनने केला आहे. चीन केव्हा प्रगत झाला हे जगाला कळलेच नाही. जग झोपलं होतं आणि चीन सारखा जागा होता असं म्हणावं लागेल. चीनची मुख्य शहरं अद्ययावत् झाल्यानंतर, चीन या डॉलरच्या साठ्याचा उपयोग आपल्या आर्थिक सीमा वाढविण्याकरता मोठ्या शिताफीने करत आहे. चायना-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर हा या आर्थिक योजनेचा भाग आहे, कारण ह्या मार्गाद्वारे चीन आपली पुढची योजना आखत आहे हे निश्चित. प्रश्न असा उद्‌भवतो की चीन नव्या 'सिल्क रोड'चं पुनर्जीवन स्वतःच्या फायद्यासाठी करत आहे की जगाच्या कल्याणाकरता. ज्या ज्या देशातून हा रस्ता जाणार आहे त्या त्या देशाची दालनं खुली होऊन चीनच्या बाजारपेठेची कक्षा वाढणार हे उघड आहे. पण जर हा रस्ता इतर देशांना दळणवळणासाठी खुला होत असेल तर त्या देशांनासुद्धा याचा आर्थिक मोबदला मिळेल. एवढंच की त्या देशांचा माल त्यांच्या इष्टस्थानापर्यंत चांगल्या स्वरूपात पोहचला पाहिजे.. तेव्हा भारतालासुद्धा या नव्या रस्त्याचा उपयोग होईल; पण भारताने स्वतःच्या हद्दीतून ह्या रस्त्याला जाण्यास परवानगी दिली पाहिजे. शेवटी जागतिक दळणवळणासाठी आंतरदेशीय रस्त्यांना दुसरा पर्याय नाही. या बाबतीत भारताने दूरदृष्टी ठेवावी असे वाटते, परंतु दहशतवादी या रस्त्याचा दुरुपयोग करण्याची शक्यतासुद्धा नाकारता येण्यासारखी नाही.

*

## शुद्धिपत्र

गतांकी श्री. संदीप दहिसरकर यांच्या लेखात संपादकीय नजरचुकीने काही चुका राहिल्या. क्षमस्व. त्या कृपया खालीलप्रमाणे दुरुस्त कराव्यात.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पृष्ठ २वर, | कॉलम १, | ओळ ११ - | hostorical | ऐवजी | historical |
| | | ओळ ३८ - | roman | ऐवजी | Roman |
| | | ओळ ४७ - | oportinity | ऐवजी | opportunity |
| | | ओळ ५८ - | publised | ऐवजी | published |
| | | ओळ ५८ - | India | ऐवजी | Indian |
| | कॉलम २, | ओळ ३० - | retuals | ऐवजी | riteuls |
| | | ओळ ३३ - | meal | ऐवजी | medal |
| | | ओळ ३७ - | pandharpur | ऐवजी | Pandharpur |
| | | ओळ ४० - | seth | ऐवजी | Seth |
| | कॉलम ३, | ओळ २ - | jalgaon | ऐवजी | Jalgaon |
| | | ओळ ३५ - | pricely | ऐवजी | Princely |
| | | ओळ ३९ - | Presidecy | ऐवजी | presidency |
| | | ओळ ४१ - | Webley | ऐवजी | Wembley |
| | | ओळ ५४ - | Crowed | ऐवजी | crowds |
| | कॉलम ४, | ओळ २२ - | Cladstone | ऐवजी | Gladstone |
| | | ओळ २६ - | historical of Hindu Gods हे वगळणे | | |
| | | ओळ ३० - | protraits | ऐवजी | potraits |
| | | ओळ ४९ - | assised | ऐवजी | assisted |
| | | ओळ ७० - | Familiear | ऐवजी | familiar |
| पृष्ठ ५वर, | कॉलम १, | ओळ २ - | paintins | ऐवजी | paintings |
| | शेवटची ओळ | - | sagarmanthan | ऐवजी | sagarmanthana |

*

**कथाकली**

# पर्याय

**-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

'अहोऽऽ.. अमृतानं अमेयला हाक मारली... तुम्ही गॅलरीत काय बसलायत? जरा अनुरूपाच्या ह्या बंटीला घ्यानं! रडतोय मघापासून...'

''त्याला भूक लागलीय का? बिस्कीट भरव नं!''

''छे हो! आत्ताच खाणं झालंय त्याचं. घरात बसून मुलं संध्याकाळच्या वेळी किरकिर करतात. आता अनुरूपा येईल आणि त्याला घरी घेऊन जाईल. अभिनवची छोटी आरोहीसुद्धा रडतेय. तिचं ओलं दुपटं बदलायला हवंय. आणि पाठोपाठ अर्णवला सुद्धा तयार करायचंय. अभिनवला चहा द्यायचाय. त्याचं चहा खाणं झालं की तो क्लिनीकमध्ये जाईल.''

''अमृता, अगं आपली मुलं लहान होती नी तू नोकरी करीत होतीस, तेव्हासुद्धा तुझी एवढी परवड होत नव्हती.''

''तेव्हा त्यांना सांभाळायला नोकर ठेवला होता आपण. त्यामुळे तुमच्या आईबाबांनासुद्धा त्रास झाला नाही.''

''आता अभिनवला सांगूया कुणी तरी नोकर बघ म्हणून-'' तेवढ्यात अभिनव अमृताला हाक मारीत तिकडे पोहोचला. त्यानं अमेयचं वाक्य ऐकलं नी म्हणाला - ''बाबा, अनुरूपाला सांगा नं बंटीला सांभाळायला कुणीतरी ठेव म्हणून. सकाळी बंटीबरोबर तो नोकर किंवा ती मुलगी इकडे येईल, दिवसभर मुलांना सांभाळेल नी संध्याकाळी अनुरूपाबरोबर परत जाईल. अनुरुपालासुद्धा तिच्या घरात कामासाठी नोकर उपयोगी पडेल.''

अमेयनं अमृताकडे बघत नजरेनंच सुचवलं - अमृता, बघितलंस? अमेयनं स्वत:चा खर्च कसा टाळला आणि अलगद अनुरूपाच्या खाती लिहिला ते?.... अमृतानं फक्त अमेयलाच कळेल असं स्मित केलं. अमेयनं मुकाट्यानं बंटीला कडेवर घेतलं. अमृता आरोहीचं दुपटं बदलण्यात गुंतली आणि नंतर अभिनवसाठी चहा करायला स्वयंपाकघराकडे वळली. जाताना तिनं अमेयला 'चहा घेणार का?' असं विचारलं. अमेय नकार देत म्हणाला - बंटी घरी जाईल आणि अर्णवची आई घरी येऊन त्याला फिरायला घेऊन जाईल तेव्हाच कर. आता चहा प्यायला हात रिकामे नाहीयेत. बंटीला खेळवतोय नं!'' अमेयचं बोलणं संपायच्या आत अनुरूपा आली. आल्या आल्या तिनं पर्स धाडकन कोचावर टाकली. पंखा चालू करून ती कोचावर डोकं मागे करून टेकून बसली आणि अमृताला म्हणाली -

''आई, चहा ठेव.''....

थोड्या वेळानं तिनं अनुरूपाच्या हातात चहाचा कप ठेवला आणि विचारलं - ''का गं? अशी का बसलीयस? बरं नाहीय का?''

''नाही, तसं नाही. पण तू बस इकडे. मला काही सांगायचंय.'' चवीचवीनं घुटके घेत अनुरूपानं चहा संपवला आणि म्हणाली - ''आई, एक बातमी आहे.- आशीषला अमेरिकेला जायचंय...''

''अरे वा! इतकी छान बातमी तू इतक्या गंभीरपणे का सांगतेयस? ऑफिस पाठवतंय? कधी जातायत?''

''नाही गं - त्याचा अमेरिकेचा खर्च झेपत नाहीय... मी कुठली जाणार?''

''पण... त्याला स्कॉलरशिप मिळाली असेलच...?''

''अर्धीच मिळालीय. अर्ध्या फी ची व्यवस्था आम्हीच करायचीय... अं... आई, बाबा, मला पैसे देऊ शकाल तुम्ही?''

''न.... नाही गं अनुरूपा, आम्ही कुठून एवढा खर्च करू शकणार?'' - अमृता उत्तरली.

''एवढी छान संधी आलीय... पण गमवावी लागणार''... अनुरूपानं उसासा टाकला... ''सासरेही नाही म्हणतायत. त्यांनी फ्लॅट घ्यायला मदत केली नं! खरं तर चिमूटभरच केली..''

''पण... आशीष तर म्हणाला होता की त्यांनी फ्लॅट घेऊन दिला म्हणून?''- अमृतानं विचारलं.

तशी घाईघाईनं अनुरूपा उत्तरली - ''नुसता फ्लॅट घेऊन काय उपयोग? तो सजवणं महत्त्वाचं - तो सजवताना आमची शिल्लक खर्ची पडली नं!... शी! आता एवढी सुंदर संधी वाया जाईल... अं... एक सुचवू?... आपला नाशिकचा फ्लॅट आहे नं.... तो विकून नाही का काही करता येणार?''

''अमेय म्हणाला - ''अगं तो फ्लॅट आम्ही तुलाच देणार होतो. हवं तर तो विका आणि घ्या पैसे.''

''नाही हं. - अभिनव म्हणाला'' असं चालणार नाही. त्या फ्लॅटवर माझासुद्धा हक्क आहे. अर्धे पैसे मी घेणार.''

''उरलेला अर्धा पैसा कसा पुरेल?'' - अनुरूपा वैतागून म्हणाली, ''आई, बाबा, तुम्हाला आणखी पैसे उभे करावे लागतील.... एवढ्या वर्षांचं तुमचं सेव्हींग असेलच नं?''

''हे बघ, तुझं इंजिनीयरींगचं नी अभिनवचं एम.डी. पर्यंतचं शिक्षण, तुमची दोघांची लग्नं, तुझं बाळंतपण, अभिनवच्या बायकोचं दुसरं बाळंतपण.. ह्या सगळ्या गोष्टींमध्ये खर्च झाले की आमचे पैसे!'' - अमृतानं हिशेब सांगितला.

''तुमचा दोघांचा रिटायरमेंटचा फंड असेलच नं?'' अनुरूपानं विचारलं.

''त्याच्या व्याजावरच घरखर्च कसाबसा भागवतोय आम्ही - आता ह्या तीन तीन मुलांना सांभाळतोय. पण झेपत नाहीय. नोकर ठेवावा लागेल.'' - अमृतानं सुतोवाच केलं.

''खरंच! तुझ्या हाताशी आता तरी नोकर ठेव... ते जाऊ दे.. अं... कशी करणार व्यवस्था?'' अनुरूपानं विचारलं.

''अगं, आशीषला कर्ज घ्यायला सांग नं! एज्युकेशनल लोन मिळतं... नोकरी मिळाल्यानंतरच ते फेडायचं असतं...''

''आई, अभिनव तुमचा लाडका होता हे मला चांगलंच माहीत आहे. अभिनवच्या परदेशातल्या शिक्षणाचा खर्च तुम्हाला करता आला. तेव्हा तुम्हीच ते कर्ज काढलंत आणि तुम्हीच फेडलंत. मग आशीषच्या शिक्षणासाठी तुम्हीच कर्ज का काढत नाही?''

''आता रिटायर झाल्यानंतर आम्हाला कर्जाचे हप्ते परवडणार नाहीत. शिवाय बँकेकडे तारण काय ठेवणार? तेव्हा एन.एस.सी. तसंच विम्याची पॉलिसीही होती. आता मोठी गुंतवणूक आमच्या फंडाखेरीज काहीच नाहीय.''

''अं... अजून एक पर्याय आहेच की! अनुरूपाचा आता ह्या फ्लॅटवरही डोळा आहे. खरं तर ही अगदी व्यवहार्य गोष्ट आहे. हल्ली पुष्कळसे लोक मुंबईतले फ्लॅटस् विकतात आणि लांब कुठेतरी जातात....'' अभिनव म्हणाला.

अमेय नी अमृता सुन्न होऊन ऐकत होते. अभिनव पुढे म्हणाला - ''मी सुद्धा फ्लॅट घेतोय. आम्हाला वेगळा संसार करायचाय. तुम्ही अनुरूपासाठी नाशिकचा फ्लॅट ठेवलात आणि हा फ्लॅट माझ्यासाठी. पण ह्या फ्लॅटचा उपयोग तुमच्यानंतर होणार. अनुरूपा नाशिकचा फ्लॅट विकून आत्ताच पैसे घ्यायचं म्हणतेय. मलाही आत्ताच पैसे हवेत.''

''अभिनव, तिला जे सांगितलं, तेच तुला सांगते मी. कर्ज घे.''


''अंहं! तुम्ही आयुष्यभर सगळ्या प्रकारची कर्ज घेत बसलात आणि मोठं व्याज भरत बसलात. नेहमी म्हणता आमच्या मागण्या पुरवण्यासाठी घेतलीत असं. काढायचीच नव्हतीत कर्ज.''

''पण तुम्ही मुलं तेव्हा ऐकत होतात का? त्यावेळी तुम्हाला हव्या असलेल्या वस्तूंसाठी जीव टाकत होतात. नीहारही मागायचा. पण त्याचे वडील नरेशकाका देऊ शकत नव्हते. म्हणून तो त्यांच्याशी आत्ता वाईट वागतोय असंही म्हणता तुम्ही मुलं! आणि आम्ही तुम्हाला वस्तू पुरवल्या, तरी आम्हालाच दोष देताय तुम्ही? आता तरी आमचा नाईलाज समजून घ्या.'' अमृता बोलत होती.

तिला हातानंच थांबवीत अभिनव म्हणाला - ''अगं, तेव्हा वस्तू नसत्या मिळाल्या तरी चाललं असतं. पण आता आमचं आयुष्य ह्या वळणावर आल्यानंतर तुम्ही नाही म्हणणं अयोग्यच आहे नाही का?- आम्हाला आता आमचा शेअर हवाय - अनुरूपा असं म्हणताच हतबुद्ध होऊन अमेयनं विचारलं -

(पान ५ कॉलम ४ वर)

**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



संवाद

# भारतीय टपालसेवेचा इतिहास

-विश्वास अजिंक्य

*(विविध माहितीतज्ञ आणि उद्योजक, लेखक श्री. विश्वास अजिंक्य यांचे 'संवाद' हे नवे सदर सुरू करीत आहोत. -संपादक)*

ई-मेल हे इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या सहाय्याने संदेश पाठवण्याचे तंत्रज्ञान. ई-मेलने एका लेखकाने संगणकावर टंकलिखित करून पाठवलेला मजकूर अगदी थोड्याच वेळात दुसऱ्या एका किंवा अनेक वाचकांपर्यंत पोहोचतो. पण ज्या काळात इंटरनेट, ई-मेल, दूरध्वनी, फॅक्स वगैरे सोयी नव्हत्या, त्या काळात संपर्कासाठी दूर अंतरावर रहाणाऱ्या आप्तांची ख्याली-खुशाली आणि त्यांना ती कळवण्याचा 'पत्र' हा एकमेव मार्ग होता. पत्रव्यवहार हे मानवी दळणवळणाचे प्राचीन साधन आहे. आपल्या देशात सरकारी कामासाठी ''टपाल'' पाठवण्याची प्रथा १३व्या शतकापासून सुरू आहे. ही ने-आण करणाऱ्या माणसांना जासूद, कासिद वगैरे नावे होती. टपालाची ने-आण करणाऱ्या माणसांना जंगलातून प्रवास करताना हिंस्र प्राणी व डाकूंची भीती असायची. हे लोक ऊन, वारा, पाऊस यांची तमा न बाळगता नद्या, नाले, जंगले पार करून टपालाची ने-आण करत. मुघल बादशहा बाबर आणि अकबराने टपाल सेवेत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी टपाल व्यवस्थेसाठी घोडे तैनात केले. अकबराने घोडेस्वारांबरोबरच वाळवंटातून टपाल नेण्यासाठी उंटांची व्यवस्था केली. तर शेरशहा सुरीने पक्के रस्ते बांधून ही सेवा जलद केली. त्याकाळी सरकारी पातळीच्या आश्रयाने खासगी पत्रांची थोडीफार ने-आण होत असे; पण हा पत्रव्यवहार समाजातील उच्चभ्रूंसाठीच मर्यादित होता. खऱ्या अर्थाने टपालसेवा सर्वसामान्य लोकांसाठी सुरू करण्याचे श्रेय इंग्रजी सरकारला जाते.

इंग्रजांचे राज्य आणि व्यापार यांची सूत्रे इंग्लंडमध्ये असल्यामुळे त्यांना टपालाची गरज सर्वसामान्य माणसांपेक्षा अधिक होती. म्हणूनच इंग्रजांच्या अधिपत्याखालील ईस्ट इंडिया कंपनीच्या मद्रास, मुंबई आणि कलकत्ता येथील वखारींनी आपापसातील संपर्कासाठी १७६४ मध्ये पहिल्यांदा पोस्टाची सेवा सुरू केली. पण ही सेवा ईस्ट इंडिया कंपनीसाठीच वापरण्यात येत होती. कंपनीच्या नोकरांना त्यांची खाजगी पत्रे पाठवायची मुभा होती. हळूहळू ही सेवा कंपनीसरकारच्या अधिपत्याखालील बाकी ठिकाणीसुद्धा सुरू करण्यात आली. ही टपालसेवा तत्कालीन गव्हर्नर जनरल वॉरेन हेस्टिंग्ज यांनी १७७४ साली सर्वसामान्य लोकांसाठी मोकळी केली. १९व्या शतकाच्या मध्यावर इंग्रजांनी टपालाकडे अधिक लक्ष पुरविले आणि सर्व जनतेच्या पदरात टपालाचा फायदा पडेल अशा तरतुदी अंमलात आणल्या. डाकेच्या ने-आणीची जबाबदारी सरकारने पत्करल्यावर पत्रांची लांबी, रूंदी, वजन या संबंधीचे नियम जारी करून, डाक जेथे जावयाचे असेल तेथील अंतराप्रमाणे खर्चाचे कोष्टक बनविले. अंतर व वजन यावर ठरविलेली रक्कम टपालकचेरीत भरून टपालावर पावतीचा कागद चिकटवावा लागे.

त्याकाळी लोकांचे शिक्षण अगदी नावालाच झाले असल्याने लोकांचा आपापसातील पत्रव्यवहारही बेताचाच होता. पत्रे दुसऱ्याकडून लिहून घ्यावी लागत. ते काम करणारी माणसे पोस्टाच्या आवारातच भेटत. अर्थात त्यांना पत्र लिहिण्याच्या कामाबद्दल मेहनताना द्यावा लागत. त्याकाळात फ्रेंच बनावटीच्या पातळ कागदावर पत्र खरडले जायचे. त्याची घडी न करता सुरळी करून, कोऱ्या जागी पत्ता लिहिला जायचा. पण तो सापडण्यासाठी इतका तपशील लिहिला जायचा की तो दुर्बोध होऊन टपाल वाटणाऱ्याला संशोधन करायची वेळ यायची.

भारतात टपालावर तिकीट लावायची सुरूवात १८५२ मध्ये झाली. १ जुलै १८५२ मध्ये सिंध प्रांताचे तत्कालीन आयुक्त सर बार्टले फ्रीयर यांनी फक्त सिंध प्रांतात आणि मुंबई कराची मार्गावर प्रयोगिक तत्त्वावर 'सिंध डाक' नावाने टपाल तिकीट सुरू केले. अर्धा आणा मूल्याचे हे तिकीट कागदावर लाखेचा ठसा उमटवून केले होते. परंतु या तिकीटाचा प्रयोग फारसा यशस्वी झाला नाही. कारण लाखेचे तुकडे पडायचे व ते सांभाळून ठेवणे जिकरीचे व्हायचे. १ ऑक्टोबर १८५४ रोजी ईस्ट इंडिया कंपनीने आधी अर्धा आणा, नंतर एक आणा, दोन आणे व चार आणे मूल्याची लिथोग्राफी पद्धतीने छापलेली देशभर चालणारी टपाल तिकीटे सुरू केली. या तिकीटावर महाराणी व्हिक्टोरियाचे चित्र छापले होते. तर स्वतंत्र भारताचे साडेतीन आणे मूल्याचे पहिले टपाल तिकीट २१ नोव्हेंबर १९४७ रोजी काढले गेले. त्यावर भारतीय झेंडा होता.

१९व्या शतकाच्या मध्यावर पोस्टखात्याने वेग पकडला. याला बहुतांशी कारण आगगाडी हे आहे. आगगाड्यांनी देशातल्या दूरदूरच्या शहरांशी संबंध जोडला गेला. आगगाडीने टपालाची ने-आण सुरक्षित, सुकर व

(पान ६ कॉलम २ वर)

उद्यम्

# PROJECT: **POTATO WAFERS for New Startup**

**-Mr Sudesh Prabodh Desai**

*(We would like to thank Mr. Sudesh Prabodh Desai who has agreed to give our readers valuable insights and inputs for those dreaming of entrepreneurship. He is the director at Aarana Solution Pvt. Ltd. where they create entrepreneurs through training and support. They have trained more than 2000 people for the last 16 years and assisted many of them to start their own business in varios fields. He is also proprietor of Speciality Manufacturing Company where they have been manufacturing Home Dehydrator Machines , Chocolate Melting Machines, Chocolate)*

Remember the last time you tasted potato wafers?? Weren't they tasty and delicious. Potato wafers are served and eaten on many occasions like …..Birthday parties, Kitty parties, evening snacks, in theaters while watching movies, in Bars and Restaurants, as a Healthy food while fasting, and even in children's tiffin box the applications are endless. Hence Wafer industry is always growing. Wafers are available in various varieties like Salted , Tomato flavor, Spicy Flavor, lemon, chat, and again endless varieties… Have you wondered, what can be the cost of manufacturing these wafers and what can be the profitability? Have you heard the name of Balaji wafers… their turn-over is 1500 crore , or have you heard the name Haldiram … It is 4000 cr company. There are many companies who have crossed 500 crorers by just selling wafers. The business of snacks will be worth Rs 35,000 crore in India by 2020, according to research firm Euromonitor,

Do you also want to start and achieve such kind of results ?

The process of manufacturing wafers is not so complicated. Anybody can manufacture wafers and the demand for wafers is always more than supply.

The process of making wafers is :

1. Take good quality potatoes used for wafers
2. Peel the skin of potatoes either manually or in a peeling machine.
3. Make slices of potatoes either manually or by machine (here you can make different shapes and sizes)
4. Do Blanching i.e dip the potatoes in Hot water for ½ a minute.
5. Fry these chips in oil.
6. If flavoring is required do the needful. Eg. Salted , tomato flavor, sweet and sour spicy, tangy etc.
7. With each different flavor a new product can be manufactured.
8. Do attractive packing. Attractive packing always increases the sale and packing gives the product a longer shelf life.

COSTING :

✳ The cost of production come to around Rs. 110/- to Rs. 120/- per kg

✳ Some companies sell wafers for Rs. 440/- per kg or Rs. 380/- per kg.

✳ If you are able to generate Rs. 25/- profit per kg and are able to manufacture 100 kgs per day, then your profit would be Rs. 2,500/- per day. Similarly Rs. 2500/- x 25 days = Rs. 62,500/- per month. Hence yearly profit would be Rs. 7,50,000/-

✳ Similarly if you keep a margin of Rs. 50/- per Kg, Then annual profit would be Rs. 15 Lakhs per year.

✳ If we manufacture 500 kg per day then 500 kg x Rs. 25/- (profit per kg) x 300 days per year would give you a profit of Rs. 37,50,000/- per year or

✳ 500 x Rs, 50/- (profit per kg) x 300 days per year would give an annual profit of Rs. 75 Lakhs

✳ If one produces 1000 kg per day, then 1000 x 25 x300 = Annual profit of Rs. 75 Lakhs and 1000 x 50 x 300 = Rs, 1.5 Crores profit annually

Is this profit less?????? No job will give you such returns . Only through business it is possible.

In the same set up one can manufacture Banana wafers as well as different types of Farsan like Shev, Gathiya, Bujia , Chivada etc.

Machines required for Potato Processing Plant

1) Potato Peeling Machine
2) Slicing Machine
3) Blanching Machine
4) Hydro Machine
5) Electric Frying Machine
6) Flavor Coating Machine
7) Packing Machine

Finally the question remains is …Now we can manufacture these wafers , but how do we sell the products ?

Marketing is not so complicated.

For example if we want to sell 1000kg per day and our packets are of 500gms each then we will be manufacturing 2000 packets/per day.

A single Distributor covers around 2500 retailers , if we supply 20 packets to one retailer then in 100 shops we will be able to achieve our target, in just 2 salesman our target will be achieved.

For more details:

Please email on 7sdesai@gmail.com

✳

## Dreaming Of A Pathare Prabhu Enterprise

**Milind Kothare**

I had a invite to visit the Pathare Prabhu Udyogini organised this May but some how could not attend that event but I thought let me share my dreams on the platform provided by Prabhu Tarun

These days foodies are really hyper active on the social media posting various traditional recipes on the face book some of them are quite contemporary & outstanding one such recipe I found was that of a burger made of besan with all ingredients in their natural colour.

I strongly feel that we should not just keep our creativity with our unique recipes indoors but market it to the outside world today for which we need to comply with following process to place it on a podium of food market

**Marketing Our Recipes**

*a) Bulk Production*

We need to convert the skills from domestic amateur recipes to bulk production probably a tie up between culinary experts with in community & organisations like Kutumb sakhi would be an ideal one in such venture

*b) Identifying Exclusive recipes*

Need to identify recipes which can be marketed as high end dessert's like a burger made of besan or kelaychi poli ( made of kelyacha halwa stuffings /banana toffee for others ) or banana sheera made in pure ghee usually made for Satya Narayan Pooja *the list could selectively expanded point here is it needs to exclusive where food connoisseurs say wow after the first bite*

*c) Develop Attractive Packaging*

In order to show case our recipes to withstand competition we need to develop attrctive packging just there are cost effective solutions available in the market

*d) Develop Marketing Channels*

Need to identify channels like high end dessert shops, premium bulk caterers, quality hotels chains with food marketing as priority ITC hotels gives a lot of weightage to traditional Indian recipes

Floating A Outfit Which Will Give Know How For Food Festivals In Quality Hotels

All quality hotels like most big chains chefs are constantly looking out for a theme to do a food fest this outfit will need to possess & invest in the following & obviously, it is outsourced at good value

Authentic traditional Pathare Prabhu menu covering typical items in following category

a) Soups
b) Starters
c) Main Course (Fish /Mutton/ Chicken/Vegetarian)
d) Desserts

Typical traditional costumes in which waiters both male & females can be dressed

Typical small décor or art affect items which will give a touch of a Pathare Prabhu culture or a household

This effort will really bring our rich food heritage in forefront while creating a business/ enterprise opportunity for quite few who have the necessary skill set

Let me also share about more than a decade ago me & solicitor Rajan Jaykar sold this concept to Then Holiday Inn Pune but unfortunately there was a change of guard there hence we could not break through.

(पान ३ कॉलम ४ वरून)

''मग आता तुमचं काय म्हणणं आहे?''

''हा फ्लॅटही विका. दोन्ही फ्लॅटस विकून त्याचे तीन भाग करू. तुमचा भाग घेऊन काय करायचं ते करा नं' अभिनव म्हणाला.

''खरं सांगू? नीराआत्या नी नरेशकाका गेलेयत तसे वृद्धाश्रमात का जात नाही तुम्ही?''

आम्ही निहारला दोष देत होतो. तरीही निहारला नरेशनं घराबाहेर काढलं तसं तुमच्यावरचं घराचं छत्र नाहीसं होऊ नये म्हणून धडपडलो... तरीही नरेशचंच प्राक्तन आपल्याला देव देतोय... का? कसं काय? कशासाठी? फक्त ह्याच प्रश्नांची मालिका अमेय नी अमृताच्या मनात वारंवार उमटू लागली... केव्हा तरी मनाच्या सुन्न अवस्थेत त्यांनी हे मान्य केलं आणि एक टॅक्सी वृद्धाश्रमाच्या दिशेनं गेली...

''आसरा' वृद्धाश्रमात बसून हे सगळं आठवताना दोघांचे डोळे एकसारखे भरून येत होते.

हे सगळं ऐकून नीरजा आणि नरेश म्हणाले - ''आम्ही समजत होतो की तुमच्या पायाखाली फुलांच्या पायघड्या आहेत नी आमच्या पायाखाली काट्यांच्या. पण तेव्हा हे माहीत नव्हतं की दोन्ही वाटा एकाच मुक्कामाला पोहोचणार आहेत.''

''खरंय! आमच्या वाटेवर मखमली पायघड्या आहेत असं वाटायचं तुम्हा सगळ्यांना. पण ती वाटही वृद्धाश्रमाच्याच मुक्कामी पोहोचली'' - सौरभ आणि सरिता म्हणाले.

''आम्ही इथे आलो तेव्हा वाटलं की आता कुणाचाच आधार काठी म्हणून वापरायचा नाही. पण आता तसं वाटत नाही. आपण सहाजण एकमेकांच्या काठ्या बनून राहू. आता आपलं सहाजणांचं कुटुंब इथं एकत्र राहील. मला भीती वाटायची की वृद्धाश्रमात अपंग, विकलांग व्यक्तींना ठेवलं जात नाही म्हणतात. कारण त्यांची सेवा करायला कुणीही तयार नसतं. पण आता ती काळजी मिटली. आपण सहाजण एकमेकांची सेवा करू. अगदी शेवटपर्यंत. इथंही तडजोडच करायची आहे. पण एकमेकांच्या साथीनं. भावनिक साथसुद्धा द्यायचीय...''

वृद्धाश्रमाचा मुक्काम हे त्या सर्वांचंच प्रारब्ध होतं. ह्या प्रारब्धाला पर्याय नव्हता...

नाईलाजानं स्वीकारलेला तरीही चांगला ठरलेला आयुष्यभराचा हा एकमेव पर्याय...

*

## पाठारे प्रभू चॅरिटीज

'शारदेच्या दरबारातील विद्याभूषण मानकरी २०१७'चा सोहळा १० डिसेंबरला 'एमव्हीएम' कॉलेजच्या सभागृहात नेहमीप्रमाणेच भव्यदिव्य स्वरूपात साजरा झाला. इतिहासातील एका पाठारे प्रभूच्या कर्तृत्वाला सलाम करण्याची सुंदर परंपरा या वर्षीही राखत डॉ. शामराव नारायण नवलकर यांच्या तसबिरीला पुष्पार्पण करण्यात आले. सायंकाळी ठीक ५ वाजता यशस्वी, कर्तृत्ववान विद्यार्थ्यांची मिरवणूक चॅरिटीजच्या विश्वस्तांसहित, प्रमुख पाहुणे डॉ. सौ. सुरेखा आणि श्री. बन्सीधर सदाशिव धुरंधर यांच्या समवेत तुताऱ्यांच्या गजरात वाजत गाजत सभागृहात आली. अर्थातच समस्त प्रेक्षकांनी उभे राहून टाळ्यांचा गजरात या सर्वांचे स्वागत केले; हे सांगायला नकोच. नंतर 'सानुली दीपकळी, सूर्यतेजाने उजळी' असे सामर्थ्य असणाऱ्या दीपकळ्यांना प्रमुख पाहुणे आणि विश्वस्तांनी प्रकाशमान केले. अशाच सूर्यतेजाने उजळू शकणाऱ्या अनेक दीपकळ्यांची (विद्यार्थ्यांची) मांदियाळीच मग मंचावर विराजमान झाली. कार्यक्रमाची सुरुवात 'वंदे मातरम' या विद्या करलगीकर यांनी गायिलेल्या गीताने झाली. नंतर विद्यार्थी गौरवगीत आणि अध्यक्षाभिनंदन पेश झाले. सांगायला नकोच की नलिनी शामराव तळपदे यांच्या शब्दलयीने भारलेली ही गीते होती. अर्चना गोरे, नचिकेत देसाई, मंदार आपटे या गायकांबरोबरीने सूरांचे सप्तरंग उधळणाऱ्या होत्या सौ. रॉनिका सचिन विजयकर. गेली सोळा वर्षे हा बक्षिस सोहळा दिमाखात साजरा होतोय. दरवर्षी समर्थ, कर्तृत्ववान प्रमुख पाहुणे या समारंभाचे भूषण ठरताहेत. यावर्षी पाहुणे म्हणून आलेल्या डॉ. सौ. सुरेखा धुरंधरांनी पाठारे प्रभु ज्ञातीची खास विशेषता सांगितली. विद्यार्थ्यांना कानमंत्र देताना त्या म्हणाल्या की सर्वांगीण विकास हा 'कीवर्ड' असला पाहिजे. आज तरुणांमध्ये व्हिटॅमिन डेफिसियन्सी असते, ॲनिमिया असतो, त्याकडेही लक्ष देऊन वाटचाल केली पाहिजे. त्यानंतर या दोघा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गौरविले गेले. काहीजण बक्षिस घेताना अतिथींच्या पाया पडत होते. ही प्रभुसंस्कृती! या प्रभुसंस्कृतीचे समृद्ध दर्शन नंतर झालेल्या श्री. बन्सी यांच्या भाषणातही घडले. त्यांनी चॅरिटीजच्या सर्व विश्वस्तांना प्रेक्षागृहात उभं राहायला लावून त्यांचं आयोजनाबद्दल अभिनंदन केलं. श्री. वीरपाल राणे या आदर्श स्वयंसेवकाचं मन भरून कौतुक केलं. थोडी मिस्कीली करून विद्यार्थ्यांचे त्यांनी हसत, हसवत फार छान प्रबोधन केलं. त्यांच्या भाषणावर एक स्वतंत्र लेखच लिहायला लागेल. पण मासलाच सांगायचा तर 'अजीबसी पहेली है हाथों की लकीरोंमे लेकिन मंझिलका रास्ता नही लिखा होता' असा शेर ऐकवत ते म्हणाले की 'मित्रांनो हा रस्ता तुम्हालाच शोधायला हवा. माणुसकी न सोडता. पुढचा भविष्यकाळ खडतर आहे. अशावेळी आपलं 'परसेप्शन' समजून, काळानुसार त्यात बदल करत हे भविष्य तुम्ही घडवायला हवे. राष्ट्राला उज्ज्वल करा. अशा वेळी येणारा प्रत्येक क्षण तुमचाच आहे.' श्री. बन्सी यांच्या भाषणानंतर एक अतिशय हृद्य सोहळा प्रेक्षागृहाला भारावून गेला. चॅरिटीजमध्ये साठ वर्षे योगदान दिलेल्या श्री. वीरपाल राणे यांचा जीवनगौरव सन्मान २००८ सालीच केला होता. मात्र आता ते निवृत्त होताना त्यांचा समयोचित सत्कार पुन्हा केला गेला. 'ज्ञातीच्या मंजुषेत असतील कित्येक आभूषणे, पण त्यातील एक या सम हा वीरपाल राणे' असे म्हणत विश्वस्त श्री. राजन जयकर यांनी सन्मानपत्राचे वाचन केले आणि त्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरवचिन्ह दिले गेले. वीरपाल राणे यांचे भाषण ऐकणे ही पर्वणीच असते. या वयात, म्हणजे नव्वदीजवळ येत असताना श्री. वीरपाल यांनी तशाच खणखणीत आवाजात, जवळ कुठलाही चिटोरा न घेता चॅरिटीजचा जुना इतिहास सांगत आपले मनोगत व्यक्त केले. २१-४-१९५७ साली व्यवस्थापक मंडळाची अटीतटीची निवडणूक झाली; तेव्हा ते २८ वर्षांचे होते. त्यावेळी चॅरिटीजच्या गंगाजळीत फक्त दहा हजार शिल्लक होती अन् परिस्थिती डबघाईची होती. आज त्याच चॅरिटीजकडे कोटींच्या घरात पैसे आहेत.... इत्यादी सांगत चॅरीटीजच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा त्यांनी घेतला. यापुढेही दहा, पंधरा वर्षांत चॅरिटीजने अजून खंबीर पावले टाकून प्रगती करावी असे सांगत त्यांनी 'स्वधर्म' पाळला. या समारंभात अनेक दाते नेहमीच उदारहस्ते चॅरिटीजला समृद्ध करत असतात. त्यांची यादी विश्वस्त श्री. नितांत त्रिलोकेकर यांनी वाचून दाखविली. या वर्षीचा विशेष म्हणजे ही यादी पडद्यावरही दिसली. आभार मानले विश्वस्त श्री. राजन जयकर यांनी. सोहळ्याचे निवेदन विश्वस्त सौ. मेघा वाझकर आणि सौ. अनारकली वेलकर यांनी दरवर्षीप्रमाणे समर्थपणे केले. यावर्षीच्या सोहळ्याचा एक विशेष अधोरेखित करायलाच हवा. चॅरिटीजचे अध्यक्ष श्री. उदय मानकर अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहू शकले नाहीत. पण 'शो मस्ट गो ऑन'. भूतपूर्व अध्यक्ष आणि वर्तमान विश्वस्त श्री. अजित विजयकरांनी कुठेही उणीव राहू न देता ही धुरा सांभाळली.

त्यानंतर उभा राहिला स्वरांचा अविस्मरणीय माहोल. संगीत संयोजक आनंद सहस्त्रबुद्धे यांनी 'स्वर आले दुरुनी' वाजवून सर्व जुन्या आठवणी जुळवून आणल्या. निवेदक देवेन्द्र हे तर 'गाणी भरून घेऊन आलोय कावड' म्हणत ही कावड विविध गायकांच्या गळ्यातून उतरलेल्या गाण्यातून रिती केली. रॉनिकाचे 'ये जवळी घे प्रिय सखा भगवंता' हे गाणे 'सदा सर्वदा योग तुझा घडावा' असे वाटायला लावणारेच होते. प्रणव हरिदासची बासरी सूरांचा अचूक वेध घेत होती. साथ होती तबल्यावर अभिजित सावंत यांची. तुषार देवल, सूर्यकांत सूर्वे होतेच साथीला. वसंत देसाईंचे नातू नचिकेत देसाई यांचं गाणं या वृन्दाला

(पान ६ कॉलम ४ वर)

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ
श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ
सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✶ श्रीमती कस्तुर तळपदे यांजकडून रु. १०१/-

✶ स्वाती तारकनाथ जयकरकडून त्यांचे वडील कै. श्री. रामराव विनायक आनंदकर यांच्या ५०व्या पुण्यतिथीनिमित्त रु. ५००/-

## चुकीची दुरुस्ती

✶ गेल्या अंकात सोशल समाजाच्या दिवाळी सोहळ्यात श्री. क्षितीज जयकर यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाची माहिती देताना काही नावे चुकीची दिली गेली. ती खालीलप्रमाणे वाचावीत.

सिंथेसायझरवर श्री. प्रशांत लळित, तबल्यावर श्री. निषाद करलगीकर आणि ऑक्टोपॅडवर श्री. पंकज धोपावकर होते. शिवाय लेखात खालील उल्लेख नव्हते ते असे- संगीत नियोजन श्री. आनंद सहस्त्रबुद्धे यांचे होते आणि कीबोर्डवरही त्यांनीच साथ केली. साऊंड सिस्टीम श्री. नीतिश फणसे यांनी सांभाळली. डॉ. सुभाष आवटे (आय.पी.एस., निवृत्त अतिरिक्त पोलीस महासंचालक) श्री. किशोर जयकरांचे खास पाहुणे म्हणून उपस्थित होते. (श्री. सुहास, बहुळकर आणि आशा श्रॉफ या माझ्या परिचयाच्या असल्यामुळे त्यांचा उल्लेख मी केला होता.) -संपादक

## सांत्वन

आमच्या लेखिका आणि माझी मैत्रीण डॉ. सुमन नवलकर यांच्या यजमानांचे नुकतेच निधन झाले. श्री. सुवर्णकुमार यांच्याबरोबर असणारे त्यांचे साहचर्य डॉ. सुमनच्या आठवणीत कायम असणार आहे. आम्ही सहसंवेदक आहोत

## परीक्षेतील सुयश

### एम् कॉम् (मुंबई विद्यापीठ)

श्री. प्रथमेश राजेश धुरंधर, प्रथम वर्ग

(पान ४ कॉलम २ वरून)

जलद होऊ लागली. टपाल सुरू झाली तेव्हा त्याचा कारभार कंत्राटाने चालत असे. म्हणजे आलेले टपाल एखाद्याने सरकारच्या परवानगीने आपल्या ताब्यात घ्यायचे व आपल्या भाडोत्री हस्तकांमार्फत त्याचे गावात वाटप करायचे. टपालाची ने-आण आगगाडीने होऊ लागल्यावर टपाल वाटण्यासाठी स्वतंत्र माणसे नेमली गेली. आगगाडी मोठाल्या गावांवरून जायची व शहरांच्या टपालाबरोबर खेड्याचे टपालही घेऊन जायची. खेड्यात टपाल पोचवायचे काम तेथील माणसे उरकत. यामुळे खेड्याची डाक ४-८ दिवसांनी नेमलेल्या दिवशी लोकांच्या हाती पडायची. आगगाडीच्या ज्या डब्यातून डाक नेतात, त्या डब्यांचा रंग देखील लालच असतो. टपाल नेणाऱ्या गाडीला 'मेल' म्हणजे टपाल गाडी म्हणतात. टपालाच्या गाडीत टपालांचे कामगारही असतात. शहरातील टपालाची पोती आगगाडीत भरल्यावर ती निरनिराळ्या स्टेशनांवर देण्याचे व तेथील डाक गाडीत घेण्याचे काम ती गाडी आपल्या अखेरच्या मुक्कामाला पोचेपर्यंत चालते.

टपालाची व्यवस्था सुरक्षित आणि खात्रीची झाल्यावर कामात आस्ते आस्ते वाढ होत गेली. मनीऑर्डर, रजिस्टर, पार्सल वगैरे प्रकार या वाढीचेच आहेत. इंग्रजांनी प्रशासकीय आणि लष्करी सेवेसाठी स्थानिक लोकांना मोठ्या प्रमाणात भरती केले होते. हे नोकरदार देशभर कुठेही काम करीत. अशावेळी त्यांच्या कुटुंबीयांना पैसे पाठविणे सोयीचे जावे. यातून १८६४ मध्ये 'मनीऑर्डर' सेवेचा जन्म झाला. आपले पत्र टपालाने निश्चितपणे ज्याच्या त्याच्या हाती पडावे या व्यवस्थेला रजिस्टर करणे ही रीत आहे.

आजमितीला भारतीय डाक विभागाची व्याप्ती ही जगातील सर्वात मोठी व सर्वाधिक पोस्ट ऑफिसेसची संख्या असणारी आहे. जवळपास १,५५,००० पोस्ट ऑफिसेस भारतात आहेत. त्यातील सुमारे १,३९,००० ग्रामीण भागात आहेत. हे पाहिल्यावर कळतं की भारताला 'गावांचा देश' अस का म्हणतात.

✳

## प्रभुतरुणाची डायरी

### आत्याबाई नाव बोला

१०-१२-१७ भार्गवी अमेय नायक, दहिसर

### नांदा सौख्यभरे

२६-१२-१७ कु. मैथिली विनय त्रिलोकेकर श्री. आशीष विक्रम ठाकरे (आं. ज्ञा.)

### विवाह माणिक महोत्सव

३०-१२-१७ श्री. प्रदीप श्रीकर राणे, सौ. मेघना प्रदीप राणे

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०४-१२-१७ | श्रीमती लक्ष्मी विलास कोठारे | वय ७९, | ग्रँट रोड |
| १३-१२-१७ | श्री. रंजन खंडेराव धैर्यवान | वय ८०, | कॅनडा |
| १४-१२-१७ | श्री. सुवर्णकुमार मधुकर नवलकर | वय ६४, | वडाळा |
| २६-१२-१७ | श्रीमती मनोरमा मोतीराम कोठारे | वय ९३, | खार |
| २७-१२-१७ | श्रीमती बीना गणपतराव नवलकर | वय ६८, | विलेपार्ले |

## हौशी कला मंदिर

हौशी कला मंदिराने ६७वा क्लब डे १८ ऑक्टोबर, २०१७ रोजी दिमाखात, उल्हासात साजरा केला. '९ करोड ५८ लाख' हे रंगारंग, विनोदी नाटक याप्रसंगी सादर केले गेले. प्रख्यात कलाकार श्री. आनंद इंगळे, श्री. संजय मोने व श्रीमती सुलेखा तळवळकर (पूर्वीच्या सुलेखा धराधर) यांनी उत्तम अभिनयाने सर्व प्रेक्षक समुदायाकडून भरभरून हास्य प्रतिसाद मिळवला.

याप्रसंगी डॉ. अनिता कोठारे या प्रमुख अतिथी होत्या. डॉ. कोठारे यांनी आपल्या भाषणातून समस्त पाठारे प्रभू रसिकांना सर्व संस्थाना नैतिक व आर्थिक रूपाने पाठबळ देण्याचे आवाहन केले.

हौशी कला मंदिरचे सदस्य श्री. अतुल मो. जयकर यांनी डॉ. कोठारे यांचे स्वागत करत सर्व प्रेक्षक वर्गाला दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच दिवंगत सदस्य श्री. सुजित य. कीर्तिकर व हितचिंतक श्री. नरेश मानकर यांना दोन मिनिटे मौन पाळून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

श्रीमती रिमा धुरंधर यांनी डॉ. अनिता कोठारे यांचा प्रेक्षकवर्गाला परिचय करून दिला. डॉ. कोठारे यांनी हौशी कला मंदिराला रु. २१,०००/-ची देणगी दिली.

इतरही अनेक हितचिंतकांनी आपल्या देणग्यांनी हौशी कला मंदिराला साथ दिली.

| देणगीदार | रक्कम रु. |
|---|---|
| स्मितचंद्र नवलकर | ११,०००/- |
| वनिता कीर्तिकर | १०,०००/- |
| बॉबी विजयकर | १०,०००/- |
| उमेश नायक | १०,०००/- |
| अरुणा सुजित कीर्तिकर | १०,०००/- |
| अजित मो. विजयकर | १०,०००/- |
| मीना प्रधान | ५,०००/- |
| दुलारी अ. जयकर | ५,०००/- |
| मोहिनी रो. जयकर | ५,०००/- |
| आनंद धराधर | ५,०००/- |

नाटकानंतर दरवर्षीप्रमाणे 'लकी डीप' या कार्यक्रमाने रसिक प्रेक्षकांच्या उत्साहाला उदंड भरती आली. कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर नेहमीप्रमाणे एच.के.एम. क्लबने उपलब्ध करून दिलेल्या ठाकूरद्वार व लोखंडवाला या बससेवेचा लाभ रसिकांनी घेतला. ६७वा हौशी कला मंदिराचा कार्यक्रम हौशीने, दिवाळीचा आनंद घेत यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमाला यश प्राप्त करून देण्याचे श्रेय श्री. सुधीर धुरंधर, श्री. अतुल जयकर, श्री. अजित जयकर, श्री. रोहिल जयकर, सौ. संध्या मानकर, श्री. महेश मानकर, श्री. सुरू कोठारे, सौ. अमिता मानकर, श्री. विजय कीर्तिकर या हौशी कला मंदिराच्या सदस्यांना जाते.

(पान ५ कॉलम ३ वरून)

समृद्ध करून गेलं. शेवटी पसायदान आणि राष्ट्रगीताने सांगता झाली. नेहमीप्रमाणेच शाकाहारी/मांसाहारी भोजनाची रसदार संगत होती.

चॅरिटीजच्या कार्यकर्त्यांची अशी मांदियाळी, गुणगौरवाचा असा सोहळा! दरवर्षी आपण पाहू याचि देहि, याचि डोळा!'

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67